दि. 11/05/2023

लोकमत पान क्र. 1

# सत्ता की संघर्ष?

## महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा आज फैसला | दिल्ली सरकार-नायब राज्यपाल वादाचाही निवाडा | घटनापीठाच्या निकालांकडे देशाचे लक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** साऱ्या देशाचे लक्ष लागलेल्या महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर गुरुवारी सकाळी सर्वोच्च न्यायालयाचे पाचसदस्यीय घटनापीठ निकाल देणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी आज सुनावणीदरम्यान ही माहिती दिली. उद्याचा दिवस भरगच्च कामकाजाचा असेल, असे समलैंगिक विवाह प्रकरणावरील बुधवारी झालेल्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनू सिंघवी यांना सांगितले. या बहुचर्चित प्रकरणाचा निकाल न्या. चंद्रचूड यांनी लिहिलेला, तसेच सर्व न्यायाधीशांची सहमती लाभलेला ५-०, असा सर्वसंमतीचा असेल, असे संकेत मिळाले आहेत.

न्या. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यांच्या घटनापीठाने यावरील निकाल १६ मार्च रोजी राखून ठेवला होता. घटनापीठाला दिल्ली सरकारविरुद्ध नायब राज्यपाल याप्रकरणी १८ जानेवारीला सुनावणी पूर्ण करून राखून ठेवलेला निकालही गुरुवारीच जाहीर करायचा आहे. न्या. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील न्या. एम.आर. शहा, न्या. कृष्ण मुरारी, न्या. हिमा कोहली, न्या. पी.एस. नरसिंहा यांचा समावेश असलेल्या घटनापीठातील दुसरे ज्येष्ठ न्यायाधीश एम.आर. शहा येत्या १५ मे रोजी निवृत्त होत आहेत.

शिवसेनेतील आमदारांनी कथित पक्षांतराद्वारे दहाव्या अनुसूचीचे उल्लंघन केल्याबद्दल विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी बजावलेल्या नोटिसांना गेल्यावर्षी जून महिन्यात सुप्रीम कोर्टात आव्हान देणारी याचिका एकनाथ शिंदे गटाने दाखल केली होती. उद्धव ठाकरे यांच्याकडून विधानसभेत बहुमत सिद्ध करण्याचा राज्यपालांचा निर्णय, शिंदे यांनी घेतलेली मुख्यमंत्रिपदाची शपथ, नव्या विधानसभा अध्यक्षांच्या निवडीला आव्हान देणाऱ्या याचिका दाखल करण्यात आल्या होत्या.

### १६ आमदारांवर टांगती तलवार

- एकनाथ शिंदे
- अब्दुल सत्तार
- संदिपान भुमरे
- संजय शिरसाट
- तानाजी सावंत
- यामिनी जाधव
- चिमणराव पाटील
- भरत गोगावले
- लता सोनवणे
- प्रकाश सुर्वे
- बालाजी किणीकर
- अनिल बाबर
- महेश शिंदे
- संजय रायमूलकर
- रमेश बोरनारे
- बालाजी कल्याणकर

**घटनातज्ज्ञांकडून युक्तिवाद**

सुभाष देसाईविरुद्ध प्रधान सचिव, महाराष्ट्र सरकार या प्रकरणी सहा याचिका एकत्रित करून त्यावर घटनापीठापुढे १४ फेब्रुवारी २०२३ पासून सुरू होती. ठाकरे गटाकडून ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल, डॉ. अभिषेक मनू सिंघवी, ॲड. देवदत्त कामत यांनी, राज्यपालांच्या वतीने सॉलिसीटर जनरल तुषार मेहता, शिंदे गटाकडून ज्येष्ठ विधिज्ञ हरीश साळवे, नीरज किशन कौल, मणिंदरसिंह, महेश जेठमलानी यांनी बाजू मांडली.

नंतरच ठरेल मंत्रिमंडळ विस्तार/महाराष्ट्र



### महत्त्वाचे ११ मुद्दे

या प्रकरणात महत्त्वाचे घटनात्मक प्रश्न उपस्थित झाल्याचे मत नोंदवून तत्कालीन सरन्यायाधीश एन.व्ही. रमणा यांनी ११ प्रश्नांसह हे प्रकरण घटनापीठाकडे सोपविले होते.

१. अविश्वास प्रस्तावाची नोटीस बजावल्याने दहाव्या अनुसूचीनुसार आमदारांना अपात्र ठरविण्याची कारवाई सुरू करण्यापासून विधानसभा अध्यक्षांना रोखता येते का?

२. प्रकरण कोणतेही असो, कलम २२६ आणि कलम ३२ अन्वये एक याचिका आमदारांवर अपात्रतेची कारवाई करण्यास उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाला निमंत्रित करते का?

३. विधानसभा अध्यक्षाच्या निर्णयाअभावी न्यायालय आमदाराच्या कृतीच्या आधारे त्याला अपात्र ठरवू शकते का?

४. आमदारांविरोधात अपात्रतेच्या याचिका प्रलंबित राहण्याच्या काळात सभागृहाच्या कामकाजाची स्थिती काय असेल?

५. दहाव्या अनुसूचीनुसार अध्यक्षांनी तक्रारीच्या तारखेच्या आधारे आमदारांना अपात्र ठरविल्यास अपात्रतेची याचिका प्रलंबित असताना झालेल्या कामकाजाची स्थिती काय?

६. दहाव्या अनुसूचीतील तिसरा परिच्छेद हटविल्यास काय परिणाम होईल?

७. विधिमंडळ पक्षाचा सभागृहातील व्हिप आणि नेता ठरविण्यासाठी विधानसभा अध्यक्षांच्या अधिकारांची कक्षा काय आहे?

८. दहाव्या अनुसूचीतील तरतुदींचा परस्परसंबंध काय आहे?

९. पक्षांतर्गत प्रश्न न्यायालयाच्या आढाव्यासाठी सक्षम ठरू शकतात का? त्याची कक्षा काय आहे?

१०. एखाद्या व्यक्तीला सरकार स्थापनेसाठी निमंत्रित करण्याचे राज्यपालांचे अधिकार न्यायालयाच्या समीक्षेसाठी सक्षम ठरतात का?

११. पक्षांतर्गत एकतर्फी विभाजन रोखण्याविषयी भारतीय निवडणूक आयोगाच्या अधिकारांची कक्षा काय आहे?

CamScanner
CamScanner

दि. 11/05/2023

लोकमत पान क्र.7

लोकमत पू.पान क्र.2

# सावधान! व्हॉट्सअ‍ॅप करतेय तुमचे रेकॉर्डिंग; मायक्रोफोनचे थेट कंट्रोल

## सरकारचे चौकशीचे आदेश; गोपनीयतेचे उल्लंघन केल्याचा आरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सोशल मीडिया आणि स्मार्टफोनच्या जमान्यात प्रत्येक जण मेसेजिंग आणि चॅटिंगसाठी व्हॉट्सअ‍ॅपचा वापर सध्या करत आहे. असे असताना आता व्हॉट्सअ‍ॅपवरील युजर्सच्या प्रायव्हसीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अ‍ॅप वापरात नसतानाही व्हॉट्सअ‍ॅपवर वापरकर्त्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या मायक्रोफोनमध्ये प्रवेश केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाची गंभीर दखल केंद्र सरकारने घेतली असून, याची चौकशी करण्याची घोषणा इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी बुधवार केली.

राज्यमंत्री चंद्रशेखर यांनी ट्विटरवर लिहिले की, नवीन डिजिटल व्यक्तिगत माहिती संरक्षण विधेयक अजून तयार होत असले तरी सरकार खासगी माहितीच्या गोपनीयतेच्या कथित उल्लंघनाची चौकशी करील. याबाबत व्हॉट्सअ‍ॅपने म्हटले की, तुम्हाला कोणत्याही अनोळखी नंबरवरून कॉल आला तर तो रिसिव्ह करू नका. कॉल कट केल्यानंतर त्वरित तक्रार करा आणि अशा नंबरला ब्लॉक करा.



### नेमके काय झाले?

**१** ट्विटरच्या अभियांत्रिकी विभागातील संचालक फोड डाबिरी यांनी शनिवारी एका ट्वीटमध्ये म्हटले होते की, 'हे काय सुरु आहे? व्हॉट्सअ‍ॅप 'बॅकग्राउंड'ला मायक्रोफोनचा वापर करत होते.

**२** मी झोपेत असताना हा प्रकार सुरु होता. सकाळी सहा वाजता उठलो तेव्हा मला याची माहिती मिळाली.' डाबिरी यांच्या ट्वीटला उत्तर देताना राज्यमंत्री चंद्रशेखर यांनी म्हटले की, 'अशाप्रकारचे उल्लंघन अजिबात स्वीकारार्ह नाही. हे गोपनीयतेचे उल्लंघन आहे.

**३** आम्ही याची तातडीने चौकशी करू. खासगी गोपनीयतेच्या कोणत्याही उल्लंघनावर कारवाई होईल. डाबिरी यांचे ट्वीट व्हायरल झाले आहे. ते ६.५ कोटी वेळा पाहिले गेले आहे. डाबिरी यांनी त्यासोबत स्क्रीनशॉटही सामायिक केला आहे.

### व्हॉट्सअ‍ॅप म्हणते...

अँड्रॉइडमधील एका व्हायरसमुळे हा प्रकार घडला आहे.यात सुधारणा करण्याच्या सूचना आम्ही गुगलला केल्या आहेत.' व्हॉट्सअ‍ॅपने पुढे म्हटले की, 'वापरकर्त्यांचे आपल्या माइक सेटिंगवर संपूर्ण नियंत्रण आहे.

### 'ते' व्हिडीओ कॉल्स घेऊ नका

- ८४, ६२, ६० पासून सुरु होणाऱ्या व्हॉट्सअ‍ॅप नंबरवरून येणाऱ्या व्हिडीओ कॉल्समध्ये मोठी वाढ झाली आहे.
- कॉल आल्यानंतर काही कळेपर्यंत ठग आपले काम तमाम करतात. त्यांना फक्त तुमचा तुमचा चेहरा हवा असतो.
- यानंतर तुमच्या चेहऱ्याला अश्लील व्हिडीओ एडिट करून तुम्हाला ब्लॅकमेल करण्याचा खेळ सुरु होतो. हे व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देण्यात येत पैसे उकळले जातात.

# बेकायदा बार जमीनदोस्त केल्यानंतर पुन्हा बांधकाम

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरागाव नाक्यावर असलेल्या मानसी या बेकायदा ऑर्केस्ट्रा बारचे बांधकाम दोन वर्षांपूर्वी पोलिसांच्या मागणीवरून पालिकेने जमीनदोस्त केले असताना आता त्या ठिकाणी पुन्हा बांधकाम केले जात असल्याची तक्रार तेथील मीरा हाऊसिंग सोसायटीने पालिका आणि पोलिसांकडे केली आहे.

हा बार बेकायदेशीर असताना महापालिका अधिकारी आणि काही राजकारणी-तत्कालीन नगरसेवक आदींच्या आशीर्वादाने चालत होता. सदर बेकायदा बारचे बांधकाम तोडण्याचे निर्देश जुलै २०१६ मध्ये तत्कालीन आयुक्त अच्युत हांगे यांनी देऊनसुद्धा कारवाई झाली नव्हती. ऑर्केस्ट्राच्या आड बारमध्ये अश्लील नाच चालत असल्याच्या तक्रारीनंतर कोरोना काळात पोलिसांनी छापा टाकला होता. त्या वेळी बारच्या आत बेकायदा गोपनीय खोली सापडली. त्यावेळी सहा बारबाला आणि तृतीयपंथीची सुटका करून बारचे चालक-मालक व कर्मचारी आदींवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या घटनेनंतर तत्कालीन पोलिस आयुक्त सदानंद दाते यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस आयुक्त विलास सानप आणि काशिमीरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय हजारे यांनी पालिकेकडे पाठपुरावा केला. आयुक्त दिलीप ढोले यांच्या आदेशानंतर मे २०२१ मध्ये पोलिस बंदोबस्तात पालिकेमार्फत हा बार जमीनदोस्त करण्यात आला होता. बार तोडल्यानंतर मोकळ्या झालेल्या काही जागेत पालिकेने रस्ता रुंद करून गटाराचे बांधकाम केले.



### रहिवाशांची तक्रार

पालिकेने बारचा परवाना रद्द केला शिवाय राज्य उत्पादन शुल्क विभागाने त्यांच्या स्तरावर कार्यवाही केली, मात्र दोन वर्षांपूर्वी तोडण्यात आलेला मानसी ऑर्केस्ट्रा बारच्या जागी पुन्हा अनधिकृत बांधकाम सुरु झाल्याची तक्रार येथील रहिवाशांच्या गृहनिर्माण संस्थेने पालिका आयुक्त दिलीप ढोले, काशिमीरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संदीप कदम आदींना लेखी स्वरुपात केली आहे.

CamScanner
CamScanner

सकाळ पू.पान क्र.1 दि.11/05/2023

# नवीन वर्सोवा पुलावरून वाहतूक सुरू होणार

## खासदार राजेंद्र गावित यांचे राष्ट्रीय प्राधिकरण विभागाला निर्देश

वसई, ता. १० (बातमीदार) : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सातत्याने होणारी वाहतूक कोंडी आणि पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्या पाहता खासदार राजेंद्र गावित, माजी महापौर राजीव पाटील यांनी महामार्गाची पाहणी केली. नव्या वर्सोवा पुलावरून दोन्ही बाजूने लवकरात लवकर वाहतूक सुरू करण्यात यावी, यासाठी राष्ट्रीय प्राधिकरण विभागाला सूचना केल्या आहेत.

गुजरात ते मुंबईकडे ये-जा करण्यासाठी मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाचा वापर केला जातो; मात्र नेहमीच वाहतूक कोंडीचा त्रास वाहनचालकांना सहन करावा लागतो; परंतु याबाबत ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत. त्यामुळे अनेकदा अपघातदेखील घडतात. वाहतूक सुरळीत व्हावी, म्हणून राष्ट्रीय प्राधिकरण विभागाने नव्या वर्सोवा पुलाची उभारणी केली आहे. हा पूल रहदारीसाठी दुतर्फा खुला करावा, अशी मागणी होत आहे. तसेच पावसाळ्यात नेहमीच पाणी साचत असल्याने अडचणींचे ठरत असते. त्यामुळे लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांनी उपाययोजना करण्यासाठी पाहणी केली.


राष्ट्रीय महामार्गावरील नैसर्गिक नाले बुजवून त्यावर अनधिकृत बांधकामांचा डोलारा उभा राहत आहे.

याठिकाणी तोडक कारवाई करून पावसाळ्यापूर्वी नाले साफ करावे, असे निर्देश वसई-विरार महापालिका अधिकाऱ्यांना देण्यात आले. या वेळी खासदार राजेंद्र गावित, माजी महापौर राजीव पाटील, राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक सुहास चिटणीस, राष्ट्रीय महामार्ग अधिकारी खंडू गोव्हने, वरिष्ठ पोलिस निरीक्षक देविदास हंडोरे, महापालिका सहायक आयुक्त दयानंद मानकर आदी अधिकारी उपस्थित होते.

# भाजप जिल्हाध्यक्ष बदलाच्या हालचाली?

## राज्यातील फेर आढाव्यामुळे मिरा-भाईंदरमधील कार्यकर्त्यांमध्ये चर्चा

भाईंदर, ता. १० (बातमीदार) : भाजपकडून राज्यातील विविध जिल्ह्यांमधील जिल्हाध्यक्षपदांचा फेरआढावा घेतला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मिरा भाईंदरमधील भाजपचे जिल्हाध्यक्षही बदलण्यात येणार का, यावरून शहरात जोरदार चर्चा सुरू आहे. भाजपमध्ये गटाच्या राजकारणावरून नवा जिल्हाध्यक्ष कोणत्या गटाचा असेल, याबाबत पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून मतमतांतरे व्यक्त केली जात आहेत.



नरेंद्र मेहता



रवी व्यास

### दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांत आत्मविश्वास

दोन्ही गटांकडून वेगवेगळी मते व्यक्त केली जात आहे. व्यास गटाच्या कार्यकर्त्यांना जिल्हाध्यक्षपद रवी व्यास यांच्याकडेच राहील, असा विश्वास वाटत आहे; तर मेहता गटाच्या कार्यकर्त्यांनी अप्रत्यक्षपणे माजी उपमहापौर, मेहता यांचे समर्थक हसमुख गेहलोत यांना जिल्हाध्यक्षपदाचे दावेदार घोषित केले आहे.

आगामी निवडणुकांसाठी भाजपकडून जिल्हाध्यक्षांच्या कामगिरीचा आढावा घेतला जात आहे. भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीमध्ये नुकतेच बदल करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील परिस्थिती, पक्षाची ताकद, जिल्हाध्यक्षांची कामगिरी आदींचा लेखाजोखा घेतला जाणार आहे. मिरा भाईंदरमधील पक्षाच्या कामगिरीचेही मूल्यमापन केले जाणार आहे. सध्या कार्यरत असलेले भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. रवी व्यास पदावर कायम राहणार की त्यांच्या जागी अन्य कोणाची वर्णी लागणार, यावरून भाजप कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू आहे.

मिरा-भाईंदर भाजपमध्ये माजी आमदार नरेंद्र मेहता आणि जिल्हाध्यक्ष ॲड. रवी व्यास यांचे स्वतंत्र गट आहेत. प्रदेश पातळीवरून दोन्ही गटात समेट करण्याचे भरपूर प्रयत्न झालेत; परंतु दिलजमाई करण्यात अद्याप यश आलेले नाही. रवी व्यास यांच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्तीवरूनच भाजपमध्ये दोन गट निर्माण झाले आहेत. मेहता गटाने व्यास यांना जिल्हाध्यक्ष म्हणून मनाने स्वीकारलेले नाही. माजी नगरसेवकांचा सर्वात मोठा गट मेहता यांच्यासोबत आहे. दुसरीकडे मेहता गटाकडून सहकार्य मिळत नसल्यामुळे रवी व्यास यांनी पक्षाची नव्याने बांधणी करून बहुतांश नवे पदाधिकारी नियुक्त केले आहेत. त्यामुळे पक्षाकडून जिल्हाध्यक्ष पदासंदर्भात काय निर्णय घेतला जातो, यावरून भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता लागून राहिली आहे.

पुढारी पान क्र.5

# वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करणाऱ्या दलालास अटक

## दोन पीडित महिलांची सुटका

**मीरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

विरार पोलीस ठाणे हद्दीत वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणाऱ्या वेश्या दलालास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांनी अटक केली आहे. त्याच्याकडून दोन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे.

विरार पोलीस ठाणे हद्दीत गांधीचौक, फुलपाडा, विरार पूर्व येथे राहते घरामध्ये एक वेश्यादलाल वेश्यागमनासाठी मुली पाठवत असून त्याबदल्यात मोबदला स्विकारणार असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांना मिळाली होती.मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा युनिटचे पो.नि. संतोष चौधरी यांनी पथकासह त्या ठिकाणी छापा मारून कारवाई केली. त्यावेळी वेश्यादलाल परवीन प्रकाश यादव ही पिडीत महिला यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेगवेगळ्या ग्राहकांना त्या ठिकाणी बोलावून त्यांच्याकडून वेश्यागमनासाठी महिलांना पुरवुन त्या बदल्यात ग्राहकांकडून पैशाच्या रूपात मोबदला स्विकारत असताना मिळून आली. त्या वेश्यादलालास ताब्यात घेण्यात आले असून दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. या प्रकरणी महिला दलाला विरुद्ध विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

CamScanner

पुढारी पान क्र.5

दि. 11/05/2023

# ५० लाखांचा मुद्देमाल नागरिकांना मिळाला परत

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा भाईन वसई विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ३ हद्दीमधील विरार, मांडवी व पेल्हार पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या विविध गुन्हयांतील हस्तगत केलेला ५० लाख ६५ हजार ४८४ रुपये किंमतीचा मुद्देमाल बुधवारी पिडीत व फिर्यादी , तक्रारदार यांना परत करण्यात आला आहे.

नागरिकांना परत करण्यात आला आहे. यामध्ये पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर तसेच चोरी व घरफोडीसारख्या गुन्हयांची पोलीसांनी गुन्हे उघडकीस आणून फिर्यादी यांचा आरोपीनी चोरुन किंवा जबरीने नेलेल्या किमती वस्तु, गहाळ झालेले मोबाईल हॅन्डसेट इत्यादी हस्तगत करण्यात आले होते. विरार पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या विविध गुन्ह्यातील मुद्देमाल व प्रॉपर्टी मिसींगमधील गहाळ झालेला मुद्देमाल यांचा तपास करुन २८ गुन्हे उघडकीस आणले आहेत. या गुन्हयातील आरोपीकडुन हस्तगत करण्यात आलेले सोने-चांदीचे दागिने, किंमती मोबाईल फोन, कार टेप, दुचाकी , चार चाकी वाहने, सायकल अशी एकुण ३२ लाख ८१ हजार ७९ रुपयांची मालमत्ता तसेच विरार पोलीस ठाणे दाखल प्रॉपर्टी मिसिंग मधील गहाळ झालेले वेगवेगळ्या कंपनीचे २३ मोबाईल परत करण्यात आले.

लोकमत पान क्र.4

# महिलेचा आवाज काढून १९ व्यापाऱ्यांची फसवणूक

## दोघें गजाआड : महाराष्ट्र, गुजरातमध्ये गुन्हे; लाखोंचा गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** महिलेच्या मधाळ आवाजात बोलून १९ व्यापाऱ्यांची फसवणूक करणाऱ्या दोघा भामट्यांना मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली आहे. मनीष शशिकांत आंबेकर (४४, पळस्पे, पनवेल) आणि अन्वर अली कादीर शेख (४८, रा. कर्जत, रायगड) अशी त्यांची नावे आहेत. लेडीज बारमध्ये पैसे उधळून मौजमजेसाठी ते हे कृत्य करीत होते. महाराष्ट्रासह गुजरातमध्ये त्यांच्याविरोधात १९ गुन्हे असल्याचे उघड झाले आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर मार्गावरील श्रीराम ज्वेलर्सचे व्यवस्थापक चेतन जैन यांना ७ मे रोजी मनीष याने महिलेच्या आवाजात कॉल केला. त्यानंतर मालक दिनेशकुमार जैन यांना आपण डॉक्टर असून, सोन्याच्या चार तोळ्यांच्या बांगड्या बनवायच्या असल्याचे सांगितले. बांगड्यांची साइज आणि दोन लाखांची आगाऊ रक्कम देण्यासाठी कोणाला तरी साई आशीर्वाद रुग्णालयाजवळ पाठविण्यास सांगितले. दोन हजारांच्या नोटा असल्याने दोन लाखांच्या ५०० च्या नोटा आणण्यास सांगितले. दिनेशकुमार यांनी चेतन यांना दोन लाखांच्या ५०० च्या नोटा घेऊन पाठवले. तेथे जाताच पहिल्या मजल्यावर मनीषने त्यांना अडवले. तुम्ही तिसऱ्या मजल्यावर जाऊन मॅडमकडून साइज व चार लाख रुपये घ्या, असे सांगून सोबतचे दोन लाख मोजण्यासाठी घेतले. तिसऱ्या मजल्यावर गेले असता तेथे कोणीच डॉक्टर महिला नसल्याचे समजले. चेतनने पहिल्या मजल्यावर येऊन पाहिले असता मनीष तेथे नव्हता. या प्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात ८ मे रोजी गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ चे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे, सहायक निरीक्षक पुष्पराज सुर्वे व कैलास टोकले यांच्यासह संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रफुल्ल पाटील, समीर यादव, प्रशांत विसपुते, सनी सूर्यवंशी तसेच सायबर शाखेचे कुणाल सावळे यांच्या पथकाने तपास सुरू केला. तांत्रिक तपासाच्या आधारे गुन्हे शाखेने आंबेकर व शेख यांना काशिमीरा पोलिस ठाणे हद्दीतील स्प्रिंग या लॉजमधून अटक केली. त्यांच्याकडून साडे नऊ हजार रुपये रोख व तीन मोबाइल जप्त केले आहेत. त्यांना नवघर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.



### कुठे केली फसवणूक?

मनीषने मुंबई, पुणे, नवी मुंबई, नाशिक, नालासोपारा, कोल्हापूर, मीरा रोड, भाईंदर, पनवेल, वापी, वलसाड, सुरत भागातील १९ व्यापाऱ्यांना महिलेच्या आवाजात कॉल करून फसवले आहे. त्यापैकी ५ गुन्हे तर १४ तक्रारी अर्ज विविध पोलिस ठाण्यात दाखल आहेत.

### आतापर्यंत कुणाला फसवले?

लोणीकंद येथील पुणे ज्वेलर्स, पुण्याच्या सहकारनगरमधील मेडिकल, स्वारगेट येथील रक्ताचे नाते रक्तपेढी, कोपरखैरणे येथील छत्रपती संभाजी महाराज पतपेढी, खांदेश्वर येथील मेडिकल दुकान व मराठा ज्वेलर्स, नाशिक येथील चितळे स्वीट, कळंबोली येथील राधिका ज्वेलर्स, पनवेल येथील पनवेल ज्वेलर्स, कोल्हापूरच्या शाहूपुरी येथील वेलनेस मेडिकल, मीरा रोडच्या शांती पार्क येथील शबनम ज्वेलर्स आदींच्या चालकांना फसविले आहे.

CamScanner

CamScanner

लोकसत्ता पू. पान क्र. 1

दि. 11/05/2023

# गुन्हा दाखल असलेल्या ठेकेदारांना पालिकेची कामे

## ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** कर्मचाऱ्यांच्या निधीचा अपहार करून शासनाची फसवणूक करणाऱ्या ठेकेदारांनाच कामे देत असल्याचा प्रकार समोर आला आहे. या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून संपूर्ण ठेका प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

घनकचरा ठेकेदार दिनेश संख्ये, श्रीमती तबस्सुम ए मेमन, झाकीर के मेमन, रवी चव्हाण यांच्यावर शासनाचा कर बुडवून कर्मचाऱ्यांची, महापालिकेची फसवणूक केल्याचा आरोप आहे. त्यासंबंधी विरार पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हादेखील दाखल आहे. असे असूनसुद्धा महापालिकेने संबंधित ठेकेदारांना ठेका संपल्यावरसुद्धा मुदतवाढ दिलेली होती. अशा ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून संपूर्ण ठेक्यांची चौकशी करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने केली आहे. संबंधित ठेकेदारांना महापालिकेचा कोणताही ठेका देण्यात येऊ नये. असे झाल्यास शिवसेना जनहितार्थ मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ॲड. अनिल चव्हाण यांनी दिला आहे.

गुन्हा दाखल झाल्यानंतर या ठेकेदारांनी न्यायालयात धाव घेतली होती. सहा महिने स्थगिती मिळाली होती. मात्र आता दोन वर्षे उलटूनही या ठेकेदारांना कामे दिली जात आहेत, असा आरोप भाजपचे उपाध्यक्ष मनोज पाटील यांनी केला आहे.

### घोटाळा काय?

महापालिकेच्या स्थापनेआधीपासून हे विशिष्ट ठेकेदार विविध कामांचा ठेका घेत होते. हे ठेकेदार पालिकेला वकील, अभियंते, डॉक्टर, आरोग्य व अग्निशमन कर्मचारी, संगणकचालक, लिपिक, मजूर, सुरक्षारक्षक, मजूर, वाहनचालक इत्यादी पुरवत होते. या ठेकेदारांकडे ३ हजार २६५ हून अधिक कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कार्यरत होते. हे ठेकेदार कंत्राटी कामगारांना पूर्ण पगार न देता उर्वरित रक्कम स्वतःच्या खिशात घालत होते. जुलै २००९ पासून फेब्रुवारी २०१८ पर्यंत हे सर्व ठेकेदार महापालिकेत ठेका पद्धतीने कर्मचारी पुरवठा करण्याचे काम करत होते. या ठेकेदारांनी कर्मचाऱ्यांचे ९२ कोटी २७ लाख रुपये हडप केल्याचा आरोप आहे. कर्मचाऱ्यांच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या या ठेकेदारांनी शासनाचीही फसवणूक केली आहे. शासनाची मोठ्या प्रमाणात करचोरी करून ठेकेदारांनी कोट्यवधी रुपयांची लूट केली आहे. या ठेकेदारांनी शासनाचा सेवा कर, व्यवसाय कर भरला नाही. या ठेकेदारांनी शासनाच्या सेवा आणि व्यवसाय कराचे तब्बल २९ कोटी ५१ लाख रुपये बुडवल्याचा आरोप आहे.

म.टा. फ्रंट पेज क्र.2

# 'केरला स्टोरी'वरील बंदी; याचिकेवर उद्या सुनावणी

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

बहुचर्चित 'द केरला स्टोरी' या चित्रपटावरील बंदीच्या पश्चिम बंगाल सरकारच्या निर्णयाविरोधात निर्मात्यांनी केलेल्या याचिकेवर उद्या, शुक्रवारी सुनावणी घेण्याची सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी तयारी दर्शवली. बंदीच्या या निर्णयामुळे आम्हाला दिवसागणिक तोटा होत असल्याचे म्हणणे निर्मात्यांनी याचिकेद्वारे मांडले आहे.

या याचिकेवर तातडीने सुनावणी करण्याची विनंती ज्येष्ठ विधिज्ञ हरिश साळवे यांनी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि पी. एस. नरसिंहा यांच्या खंडपीठाकडे केली. ही याचिका पश्चिम बंगाल सरकारची चित्रपटाच्या प्रदर्शनावरील बंदी आणि तामिळनाडूत प्रदर्शन रोखण्याच्या निर्णयाला आव्हान देते, असेही साळवे यांनी खंडपीठाला सांगितले. मात्र, प्रदर्शनाला स्थगिती देण्यास नकार देणाऱ्या केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध मंगळवारी दाखल झालेल्या वेगळ्या याचिकेवर १५ मे रोजी सुनावणी घेतली जाईल व त्याचवेळी या याचिकेवरही सुनावणी होईल, असे खंडपीठाने आधी नमूद केले.




मात्र, या बंदीमुळे आम्हाला दरदिवशी आर्थिक फटका बसत असल्याचे साळवी यांनी स्पष्ट केल्यावर खंडपीठ यावर शुक्रवारी सुनावणी घेण्यास तयार झाले.

### आव्हाड यांच्या विरोधात तक्रार

'द केरला स्टोरी' या चित्रपटाविषयी वादग्रस्त विधान केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरुद्ध मंगळवारी रात्री उशिरा वर्तकनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे. भाजपचे पोखरण मंडळाचे अध्यक्ष संतोष जयस्वाल यांनी ही तक्रार केली आहे. 'द केरला स्टोरी' चित्रपट खोट्या माहितीवर आधारित असून तो चित्रपट बंद करायला हवा, यासह इतरही वादग्रस्त विधाने करत आव्हाड यांनी या चित्रपटाची बदनामी केली, असे या तक्रारीमध्ये नमूद आहे.

# 'अशा विचारांना फाशी द्यावी'

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नागपूर**

'द केरला स्टोरी' चित्रपटातून महिलांच्या विरोधात होत असलेल्या षडयंत्राचे वास्तव मांडले आहे. या चित्रपटाचा विरोध करणारे, दिग्दर्शकाला फाशी देण्याची मागणी करणाऱ्यांच्या विचारांना फाशी देण्याची गरज आहे, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. राज्यात लव्ह जिहादविरोधी कायदा आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी रात्री 'द केरला स्टोरी' चित्रपट बघितला. द केरला स्टोरी'चा कुठलाही राजकीय संबंध नाही. चित्रपटाला विरोध म्हणजे बुरसटलेली मानसिकता आहे. देशात महिलांविरोधात षडयंत्र रचण्यात येत आहे. या समस्या दूर करण्यासाठी कठोर कायद्यासह जनजागरण आवश्यक आहे. राज्यात लव्ह-जिहाद प्रतिबंधक कायदा आणण्याचे आमचे प्रयत्न आहेत. समाजातील भयाचे वातावरण दूर करण्यासाठी अधिक सजग राहून समोर जावे लागेल, असेही ते म्हणाले. आव्हाड यांनी केलेल्या वक्तव्याची चौकशी करून कारवाई केली जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

CamScanner

CamScanner

म.टा.पान क्र.३

दि. ११/०५/२०२३

# 'त्या' पोलिसांना जुनी पेन्शन योजनाच

## 'मॅट'चा निर्णय; लाभ देण्याचा राज्य सरकारला आदेश

मटा विशेष



### 'तो निधी जीपीएफमध्ये वर्ग करा'

'या अर्जदारांची तीन महिन्यांच्या आत जीपीएफ खाती उघडण्यासाठी पावले उचला. त्यानंतर आतापर्यंत डीसीपीएस योजनेंतर्गत जमा केलेला त्यांचा निधी जीपीएफ खात्यांमध्ये वर्ग करा. तसेच १ सप्टेंबर २०२३पासून जीपीएफ योजनेच्या अनुषंगाने त्यांच्या वेतनातून रक्कम वजा करा', असेही 'मॅट'ने सरकारला आदेशात स्पष्ट केले.

ऑक्टोबर २००५ रोजी अधिसूचना जारी करून १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यापूर्वी सरकारी सेवेत नियुक्त झालेल्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (डीसीपीएस) लागू केली. मात्र, एमपीएससीच्या १ नोव्हेंबर २००४ रोजीच्या जाहिरातीनुसार महाराष्ट्र पोलिस दलात पोलिस उपनिरीक्षक म्हणून भरती झालेल्या पोलिसांनी या योजनेला विरोध दर्शवला होता. आम्हाला महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (अंशराशीकरण) नियम, १९८४ अन्वये निवृत्तीवेतन व सामान्य भविष्यनिर्वाह निधी (जीपीएफ) योजनेचा लाभ द्यावा, अशी त्यांची मागणी होती. याबाबत निवेदने देऊनही राज्य सरकारने प्रतिसाद दिला नाही. म्हणून प्रफुल्ल वाघ यांच्यासह १७८ जणांनी याप्रश्नी अॅड. सुरेश पाकळे यांच्यामार्फत 'मॅट'मध्ये दाद मागितली होती.

'या अर्जदारांची निवडप्रक्रिया १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच पूर्ण झाली असली तरी त्यांच्या नियुक्त्या त्या कट ऑफ तारखेनंतर झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांना जुनी पेन्शन योजना लागू होत नसून डीसीपीएस योजना लागू होते', असा युक्तिवाद सरकारतर्फे सरकारी वकील स्वाती मणचेकर यांनी मांडला. तर 'ज्या जाहिरातीला अनुसरून आम्ही निवडप्रक्रियेत भाग घेतला होता, त्यातच सामान्य भविष्यनिर्वाह निधी व जुन्या पेन्शन योजनेचा लाभ नमूद होता. त्यामुळे आमच्या नियुक्त्यांचे आदेश हे कट ऑफ तारखेनंतर निघाले असले तरी आम्हाला जुनी पेन्शन योजनाच लागू व्हायला हवी', असा युक्तिवाद अर्जदारांनी अॅड. पाकळे यांच्यामार्फत मांडला. दोन्ही बाजू तपासल्यानंतर 'मॅट'ने पोलिसांचा अर्ज मान्य केला. 'या प्रकरणात अर्जदारांची न्याय्य अपेक्षा आहे असे नव्हे; तर जाहिरातीतच पेन्शन योजना नमूद असल्याने सरकारला नाकबुलीस प्रतिबंध आहे. जाहिरातीतील शब्द पाळणे सरकारला बंधनकारक आहे', असे 'मॅट'ने स्पष्ट केले.

म.टा.पू.पान क्र.१

# 'क्लस्टर'वर शासनाची मोहोर

## योजनेसंदर्भातील अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध

- योजना राबवण्याचा मार्ग पालिकेसाठी खुला
- ४५१ हेक्टर जागेत योजना



म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदर मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास व झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने क्लस्टर (समूह विकास योजना) योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासंदर्भातील अधिसूचना पालिकेमार्फत जारी करण्यात आली होती. या अधिसूचनावर आता शासनाची मोहर उमटली असून ती नुकतीच शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे आता ही योजना राबवण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्याचा मार्ग पालिकेसाठी खुला झाला आहे.

ठाणे महापालिकेच्या हद्दीत जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने क्लस्टर योजना राबवली जात आहे. ही योजना मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतदेखील राबवण्याचे निश्चित करण्यात आले आहे. शहरातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासातील अडथळे दूर करणे व झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टिकोनातून हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी मागील काही महिने पालिकेकडून सर्वेक्षणदेखील केले जात होते. ते पूर्ण झाल्यानंतर २४ परिसरातील ४५१ हेक्टर जागेत ही योजना राबवण्याचे ठरवण्यात आले आहे. राज्य शासनाने क्लस्टर योजनेसाठी १० कोटींचा निधीही पालिकेला मंजूर करण्यात आला आहे .

या योजनेचे काम प्रत्यक्षात हाती घेण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही करणे गरजेचे आहे. म्हणून योजने संबंधीची अधिसूचना काही दिवसांपूर्वीच पालिकेकडून जारी करण्यात आली होती. तसेच ती राजपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी शासनाला सादर करण्यात आली होती. या अधिसूचनेला शासनाने मंजुरी देत ती नुकतीच राजपत्रात प्रसिद्ध केली आहे. आता अधिसूचना जारी झाल्याने शासनाच्या इतर कोणत्याही परवानगीची आवश्यकता पुढील कार्यवाहीसाठी पालिकेला भासणार नाही.

### गावठाण, कोळीवाड्यांचा समावेश नाही!

मिरा-भाईंदर पालिकेने जारी केलेल्या अधिसूचनेत काही गावठाण व कोळीवाड्यांचा समावेश असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे म्हणून ह्या योजनेला तीव्र विरोध दर्शवला जात आहे. ह्यावर आता पालिका प्रशासनाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. महसूल विभागाच्या नोंदीनुसार कोळीवाडे व गावठाण परिसराचा क्लस्टर योजनेत समावेश नसल्याचे मनपा अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले.

### क्लस्टरविरोधात हॅशटॅग मोहीम

मिरा-भाईंदर पालिकेने क्लस्टर योजनेत मिरा रोडच्या पेणकरपाडा गावाचादेखील समावेश केला आहे. येथील २७ हेक्टर जागेत योजना राबवण्याचे अधिसूचनेत नमूद आहे. हे गाव पालिका स्थापनेच्या आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या १९ गावांपैकी एक असताना त्याचा क्लस्टर योजनेत समावेश करण्यात आल्यानसमाज माध्यमांवर 'क्लस्टर हटवा, गाव वाचवा' अशी हॅशटॅग मोहीम सुरू करण्यात आली आहे .

CS CamScanner

CS CamScanner

म.टा.पू. पान क्र.1 दि. 11/05/2023

# पुराचा धोका कायम!

## वसई-विरारला धारण तलावांची प्रतीक्षा; तज्ज्ञ संस्थांच्या सूचनेकडे दुर्लक्ष

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी पावसाचे पाणी साठवून ठेवण्याची क्षमता असलेले धारण तलाव (होल्डिंग पॉन्ड्स) विकसित केले जाणार होते. हे उपयुक्त धारण तलाव तयार करण्याच्या सूचना तज्ज्ञ संस्थांनी पालिकेला दिल्या होत्या. त्यानुसार, त्यासाठी जागाही निश्चित करण्यात आली होती. मात्र वसई-विरार पालिकेने हे धारण तलाव आजतागायत उभारलेले नाहीत. त्यामुळे यंदाही पालिका क्षेत्रात पुराची पुनरावृत्ती होण्याचा भीती व्यक्त केली जात असून धारण तलाव विकसित करण्याची मागणी समोर येत आहे.

वसई-विरार शहरात दरवर्षी पावसाळ्यात पूरपरिस्थिती उद्भवते. शहरात पाणी साचून जनजीवन विस्कळीत होते. हे सत्र मागील चार वर्षांपासून सलग सुरू आहे. वसईत २०१८मध्ये मोठी पूरपरिस्थिती उद्भवली होती. त्यामुळे पूरस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी महापालिकेने १२ कोटी रुपये खर्चून राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (निरी) आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) या तज्ज्ञ संस्थांची नियुक्ती केली होती. या संस्थांनी २०१९मध्ये दिलेल्या प्राथमिक अहवालानुसार, नालेसफाई, नैसर्गिक नाल्यावरील अतिक्रमण हटविणे इत्यादी कामे करण्यात आली. या संस्थांनी वसईच्या भौगोलिकतेचा अभ्यास करून महापालिकेला सादर केलेल्या अहवालात धारण तलाव बनविण्याच्या सूचनाही केल्या होत्या. यासाठी नालासोपारा पश्चिमेकडे निळेमोरे, गोगटे सॉल्ट आणि नायगाव येथील सरकारी जागेत धारण तलाव विकसित करावे, असे या संस्थांनी अहवालात नमूद केले होते.

महापालिकेने त्यानुसार नालासोपारा पश्चिमेकडील नीळेमोरे सर्व्हे क्रमांक १७९ येथे हिस्सा १९ हजार ८६० चौरस मीटर इतके क्षेत्र धारण तलाव करण्यासाठी आरक्षित केले होते. त्यानंतर धारण तलाव विकसित करण्याचा निर्णय घेऊन धारण तलावांची खोली वाढविणे, त्यातील पाणी खाडीला मिळविण्यासाठी मार्गिका तयार करणे अशी कामे पालिकेतर्फे होणे अपेक्षित होते. मात्र अजूनही शहरात धारण तलाव तयार करण्यात आलेले नसून त्यामुळे पुराचा धोका कायम आहे. यासाठी पालिकेने धारण तलाव विकसित करावे, अशी मागणी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नीलेश राणे यांनी केली आहे. तर, वसईच्या गोगटे सॉल्टच्या एक हजार ५६६ एकर जमिनीपैकी ३०० एकर जागेवर धारण तलाव निर्माण करावा, अशी मागणी वसईतील सामाजिक कार्यकर्ते नितीन म्हात्रे यांनी तत्कालीन राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती.

विशेष म्हणजे धारण तलावासाठी तात्काळ कार्यवाही करण्याबाबत पालिकेला आदेश देण्याची मागणी मुख्यमंत्री सचिवालय कक्षात करण्यात आली होती. त्याची दखल घेत चार महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री सचिवालयाचे पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी मकरंद देशमुख यांनी पालिकेला याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. मात्र अद्याप धारण तलाव तयार झालेले नाहीत. त्यामुळे येत्या पावसाळ्यातही पुराची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे पालिकेने धारण तलावासाठी पावले उचलावीत, अशी मागणी सामाजिक तथा राजकीय पक्षांतर्फे पालिकेकडे करण्यात आली आहे.




> धारण तलावासाठी तीनवेळा निविदा प्रकिया राबविली होती. मात्र त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. याशिवाय आरक्षित ६५ एकर जागेत धारण तलाव करण्यास ११८ कोटींचा अंदाजे खर्च अपेक्षित आहे. हा निधीही शासनाकडून मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
>
> – **अनिलकुमार पवार**, आयुक्त, वसई-विरार महापालिका

### काय आहे धारण तलाव?

पावसाळ्यात शहरातील पाण्याचा निचरा होण्यासाठी धारण तलाव बनवले जातात. मुसळधार पावसात भरतीच्या वेळेत पावसाचे पाणी शहरात साचू नये, यासाठी खाडीकिनारी जागोजागी मोठे धारण तलाव उभारले जातात. या तलावांची उभारणी करताना संपूर्ण शहराचे नियोजन लक्षात घेण्यात येते. धारण तलावांना लागूनच मोठे फ्लॅप गेट बसविण्यात येतात. त्यामुळे भरतीच्या वेळेत हे गेट आपोआप बंद होऊन खाडीचे पाणी शहरात शिरत नाही. याशिवाय, धारण तलावात शहरातील पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था करण्यात येते.

सामना पान क्र.7

### अमली पदार्थ जप्त

**नालासोपारा** – साडेपाच लाखांचे अमली पदार्थ जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. नालासोपारा पूर्व रिलायबल प्रेस्टीज-१ या बिल्डिंगच्या बाहेर अमली पदार्थविरोधी कक्षाचे पोलीस हवालदार विष्णुदेव घरबुडे यांनी आरोपी मोहम्मद कुरेशी यांच्याकडून ५ लाख ५० हजार रुपये किमतीचे मॅफेड्रॉन जप्त केले.

### आत्महत्या

**विरार** – नैराश्याच्या भरात विरार येथील अग्रवाल पॅरामाऊंट येथे राहणाऱ्या हर्षल साळुंखे (३१) या तरुणाने आत्महत्या केली. ८ मे रोजी दुपारी घरात कोणीही नसताना पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत मंगळवारी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### कचराकुंडीत अर्भक

**वसई** – नायगाव पूर्व येथे नाल्याच्या काठावरील कचराकुंडीत मंगळवारी स्त्री जातीचे नवजात मृत अर्भक सापडल्याने परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून मंगळवारी नायगाव पोलीस ठाण्यात अर्भकाच्या जन्माची माहिती लपवून त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावल्याप्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### लॅपटॉप चोरला

**नालासोपारा** – विरार पूर्व डी मार्टजवळ शिवसाई संकुल येथे राहणाऱ्या वैभवी भिसे या महिलेच्या घरी अज्ञात चोरट्याने लॅपटॉप, वाहन परवाना, बँकेचे एटीएम कार्ड व रोख रक्कम असा ५० हजार किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत विरार पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.


CamScanner

CamScanner

# WhatsApp चलाने वाले हो जाए सावधान

नालासोपारा/अनिरुद्ध मिश्रा। व्हाट्सएप एक बार फिर से खबरों में है, यह आश्चर्यजनक कारण नहीं है - एक नया घोटाला सामने आया है। अतीत में, मैसेजिंग प्लेटफॉर्म का उपयोग बहुत सारे स्कैमर्स द्वारा लोगों को बरगलाने और उनके पैसे चुराने के लिए किया गया है क्योंकि इस ऐप पर लोगों तक पहुंचना आसान है। ऐप, जिसके लगभग दो अरब मासिक सक्रिय उपयोगकर्ता हैं, एक बार फिर स्कैमर्स के निशाने पर आ गया है। कई लोगों ने ट्विटर पर +८४, +६२, +६० और अधिक से शुरू होने वाले अंतरराष्ट्रीय नंबरों से अज्ञात कॉल प्राप्त करने की शिकायत की हैयह बताया गया है कि व्हाट्सएप उपयोगकर्ता मलेशिया, केन्या और वियतनाम, इथियोपिया जैसे देशों से बेतरतीब ढंग से कॉल प्राप्त कर रहे हैं, जो कि आईएसडी कोड का सुझाव है। अभी तक यह साफ नहीं हो पाया है कि ये कॉल लोगों को क्यों किए जा रहे हैं। लेकिन, हम जानते हैं कि कॉल की आवृत्ति काफी मध्यम से उच्च होती है। कुछ को वैकल्पिक दिनों में २ से ४ कॉल प्राप्त हुए हैं। कुछ लोग जो खासतौर पर नया सिम खरीद रहे हैं उन्हें इंटरनेशनल नंबरों से ज्यादा कॉल आ रहे हैं।

व्हाट्सएप का नवीनतम कॉल घोटाला: क्या करें? कैसे सुरक्षित रहें?

खैर, आपको घबराने की जरूरत नहीं है। कॉल करने वाले को केवल रिपोर्ट करने और ब्लॉक करने की आवश्यकता है। सुनिश्चित करें कि आप किसी अज्ञात कॉलर से प्राप्त होने वाले किसी भी संदेश या लिंक पर क्लिक न करें क्योंकि उनमें आपके डेटा या धन को चुराने के लिए किसी प्रकार का मैलवेयर हो सकता है। आपकी गाढ़ी कमाई को चुराने के लिए आपको कुछ करने के लिए भी बरगलाया जा सकता है। इसलिए, उपयोगकर्ताओं को सख्ती से सलाह दी जाती है कि वे अज्ञात कॉलर के साथ शामिल न हों और उसे ब्लॉक कर दें।

नोट: व्हाट्सएप पर एक जॉब ऑफर स्कैम भी चल रहा है और यूजर्स को सलाह दी जाती है कि वे इससे सावधान रहें और किसी अनजान व्यक्ति पर भरोसा न करें। व्हाट्सएप जैसे प्लेटफॉर्म पर आपको उस व्यक्ति की पहचान की दोबारा जांच करनी चाहिए जो आपको नौकरी दे रहा है। व्हाट्सएप एप पर नवीनतम घोटाले के मुद्दे पर प्रतिक्रिया देता है। मेटा के स्वामित्व वाली कंपनी ने लोगों को सलाह दी है कि ऐसे कॉलर्स को केवल रिपोर्ट करें और ब्लॉक कर दें। व्हाट्सएप ने इंडिया टुडे टेक को बताया, 'संदिग्ध संदेशों / कॉल को ब्लॉक करना और रिपोर्ट करना घोटालों से प्रभावी रूप से निपटने के लिए एक महत्वपूर्ण साधन है और जब उपयोगकर्ता अज्ञात अंतरराष्ट्रीय या घरेलू फोन नंबरों से कॉल प्राप्त करते हैं।' हमने अपने प्लेटफॉर्म पर अपने उपयोगकर्ताओं को सुरक्षित रखने के लिए आर्टिफिशियल इंटेलिजेंस और अन्य अत्याधुनिक तकनीक में लगातार निवेश किया है। हमारी मासिक उपयोगकर्ता सुरक्षा रिपोर्ट जिसे हम आईटी नियम २०२१ के अनुसार प्रकाशित करते हैं, में उपयोगकर्ता की शिकायतों का विवरण होता है। प्राप्त हुआ और व्हाट्सएप द्वारा हमारे प्लेटफॉर्म पर दुरुपयोग का मुकाबला करने के लिए कार्रवाई की गई। व्हाट्सएप ने अकेले मार्च के महीने में ४७ मिलियन से अधिक खातों पर प्रतिबंध लगा दिया, कंपनी ने कहा।

व्हाट्सएप पर किसी को ब्लॉक और रिपोर्ट कैसे करें

चरण १: आपको सबसे पहले व्हाट्सएप खोलना होगा, अधिक विकल्प सेटिंग्स पर टैप करें।

स्टेप २: अब प्राइवेसी, ब्लॉक किए गए कॉन्टैक्ट्स पर फिर से टैप करें।

चरण ३: बस 'जोड़ें' बटन पर टैप करें।

चरण ४: अब, बस उस संपर्क को खोजें या चुनें जिसे आप ब्लॉक करना चाहते हैं। अब आप पूरी तरह तैयार हैं।

CamScanner

# वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणाऱ्या वेश्या दलालास अटक करुन २ पिडीत महिलांची सुटका

**अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांची कारवाई.**

**वसई. प्रतिनिधी**

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली कि, विरार पोलीस ठाण्याचे हद्दीत गांधीचौक, फुलपाडा, विरार पूर्व येथे राहते घरामध्ये एक वेश्यादलाल वेश्यागमननाकरीता मुली पुरविणार आहे व त्याबदल्यात मोबदला स्विकारणार आहे.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा युनिटचे पो.नि. श्री. संतोष चौधरी यांनी कायदेशीर बाबींची पूर्तता करुन स्टाफ, दोन पंच, बोगस गिऱ्हाईक यांचे सह वर नमुद ठिकाणी छापा कारवाई केली असता वेश्यादलाल परवीन प्रकाश यादव ही पिडीत महिला यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांचेकडून वेगवेगळया ग्राहकांना वर नमुद ठिकाणी बोलावुन त्यांचेकडुन वेश्यागमनाकरीता महिलांना पुरवून त्या बदल्यात गिऱ्हाईकाकडून वेश्याच्या रुपात मोबदला स्विकारत असताना मिळुन आल्याने सदर वेश्या दलालास ताब्यात घेण्यात आले व दोन पिडीत महिलांची सुटका करण्यात आली.

नमूद महिला दलाला विरुध्द विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ४६८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७० (१) (३) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपाराच युनिटचे पो.नि. श्री. संतोष चौधरी, पो.हवा. बापू पवार, रोशन नारायण किणी, विनोद अशोक राऊत, म.पो.हवा. सुप्रिया नथू तिवले, म.पो.अम. १६१११ पुनम मधुकर जगदाळे, चालक पो.हवा. सुनिल विष्णु पागी यांनी केली आहे.

CamScanner

# महाराष्ट्र, गुजरातमधील ज्वेलर्सला लुटण्याचे १९ गुन्हे करणाऱ्या दोघा लुटारूंना अटक

◆ भाईंदर (वार्ताहर) :

मीरा रोड, भाईंदरसह महाराष्ट्रातील मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर तसेच गुजरात राज्यातील सुरत,वापी, बलसाडसह विविध शहरात १९ ज्वेलर्सला लुटणाऱ्या दोघांना मीरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा युनिट १ ने गजाआड केले आहे.

भाईंदर येथील श्रीराम ज्वेलर्स या दुकानाच्या मालकांना फोन करून महिलेच्या आवाजात आपण डॉक्टर असल्याचे सांगितले आणि त्यांच्या साई आशीर्वाद या रुग्णालयात येऊन बांगड्या करण्याची ऑर्डर घेऊन जाण्यास सांगितले. त्यासाठी दोन लाख रुपये आगाऊ रक्कम देणार असल्याचे सांगून येताना सोबत दोन लाख रुपये रुग्णालयासाठी सुट्टे घेऊन घेण्यास सांगितले होते. ज्वेलर्सचे मालक साई आशीर्वाद रुग्णालयात गेले असता तेथे आरोपीने डॉक्टरांनी आणलेली रक्कम माझ्याकडे देऊन आपण त्यांच्या बांगड्यांचे माप घेण्यासाठी जाण्यास सांगितले. दरम्यान ते पैसे घेऊन आरोपी फरार झाला. याबाबत नवघर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा तपास नवघर पोलीस तसेच गुन्हे शाखा समांतरपणे करत होते. पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ चे पो. नि. अविराज कुराडे, स.पो. नि. कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रफुल्ल पाटील, समीर यादव, प्रशांत विसपुते, सनी सूर्यवंशी, कुणाल सावळे यांनी तांत्रिक विश्लेषणावरून महिलेच्या आवाजात बोलून फसवणुकीचा गुन्हा करणारे आरोपी मनिष शशीकांत आंबेकर, नालासोपारा, अन्वर अली कादीर शेख, कर्जत, जि. रायगड यांना अटक करून त्यांची चौकशी केली असता त्यांनी श्रीराम ज्वेलर्सला फसविल्याचे कबूल केले. तसेच तपासात त्यांनी मीरा रोड, भाईंदरसह महाराष्ट्र राज्यातील मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर तसेच गुजरात राज्यातील सुरत,वापी, बलसाडसह विविध १९ शहरात ज्वेलर्सला लुटण्याच्या गुन्ह्यांची कबुली दिली.

CS CamScanner

# सहा वर्षांपासून फरार असलेला आरोपी अटकेत

■ भाईंदर, प्रतिनिधी



काशीमीरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत सन 2017 मध्ये झालेल्या खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला गुन्हे प्रकटीकरण शाखेने विरार येथून अटक केली आहे. काशीमीरा पोलिस ठाण्यात सन 2017 मध्ये दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील आरोपी सौम्य रंजन दास वय 27 वर्ष हा गेले सहा वर्षे फरार होता. त्याच्यावर भादंवि कलम 363, 302, 201, 34 अशी कलमे लावण्यात आली होती. काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदिप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत गांगुर्डे . सहाय्यक फौजदार अनिल पवार, पोहवा निलेश शिंदे, सोनकांबळे, रविंद्र कांबळे यांनी आरोपीच्या मोबाईलचे तांत्रीक विश्लेषन करून त्यास सापळा रचून विरार येथील ग्लोबल सिटी भागातली जुने विवा कॉलेज येथुन बुधवारी पहाटे ताब्यात घेतले.

CamScanner

समय भास्कर

# ठग 'ड्रीम गर्ल गिरफ्तार' करते थे बॉलीवुड स्टाइल में ठगी

## औरतों के आवाज में करते थे कॉल

**पंकज दुबे/मीरा-भाईदर ।** क्राइम ब्रांच यूनिट 1 ने दो ऐसे आरोपियों को गिरफ्तार किया है, जो ठगी करने के लिए फोन पर महिलाओं की आवाज में बात करते थे और मौका पाते ही ठगी को अंजाम देते थे 7 7 मई को इन ठगों ने श्री राम ज्वेलर्स के मालिक को अपना निशाना बनाया और उनके लाखों रुपए लेकर चंपत हो गये, फोन पर इन्होंने श्री राम ज्वेलर्स के मालिक से महिला की आवाज में बात किया, कहा कि मै डॉक्टर हु, मुझे कुछ सोने के गहने बनाने है, साथ ही अस्पताल के लिये 2 लाख खुदरा रकम कि मांग कि और मिलने के लिये साई आशीर्वाद अस्पताल के पास बुलाया 7 और मौका पाते ही ठगी को अंजाम दे दिया 7 इसकी शिकायत नवघर पुलिस स्टेशन में धारा 420 के तहत कि गयी थी, क्राइम ब्रांच यूनिट 1 ने तकनीकी और गुप्त सूचना के आधार पर इस मामले मे लिप्त 2 आरोपियों को गिरफ्तार कर लिया है 7 साथ ही पुलिस ने इन आरोपियों से 5 और मामलों को सुलझाया है जो नवघर, भाईंदर, नया नगर, अचोले दादर इन सभी पुलिस स्टेशन में दर्ज थी ।



CamScanner

# 8 held from biz hotel for cricket betting

**Mira-Bhayandar** : The Navghar police raided rooms of a business hotel in Bhayandar on Tuesday and busted a cricket betting racket. Eight people were arrested for placing bets on the T-20 IPL match between Kings XI Punjab and Kolkata Knight Riders at the Eden Garden Stadium in Kolkata. Seven of them hail from Halol city in the Panch-Mahal district of Gujarat. Acting on a tip-off, the police swooped down on two rooms in the Crown-Business Hotel near Golden Nest Circle in Bhayandar East at around 10pm. The suspects have been booked under the relevant sections of the Indian Penal Code, the Maharashtra Prevention of Gambling Act, 1987 and the Indian Telegraph Act, 1885. Two on-duty managers of the hotel were apparently aware about the illegal activities and were also taken into custody. The hotel owner has also been booked, the police said. Apart from cash and several mobile phones, the police also seized a laptop and notebooks used to note down betting transactions.

*Suresh Golani*

CamScanner

# ₹2L lost as cons mimic female voice

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

Less than 48 hours after they duped a jewellery showroom owner of Rs2 lakh in Bhayandar, two con artists landed into the custody of the crime branch unit (zone I) of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police on Tuesday. Rs9,000 and three mobile phones were also recovered from them. The action followed in response to a complaint filed by the owner of Shree Ram Jewellers who received a call from a "woman" claiming to be a doctor of a nearby hospital and wanted to purchase gold bangles weighing around 40gram.

After agreeing to buy them for the estimated cost of Rs2.80 lakh, the woman asked the jeweller to bring Rs2 lakh in the denomination of Rs500 as she needed change in the hospital and collect Rs4 lakh and keep the remaining amount of Rs2 lakh as advance payment. When one of the employees of the jeweller reached the hospital building with the cash, an unidentified person claiming to be a doctor tricked him into handing over money and asked him to go to the third floor to collect the cash. However, no such doctor was found. The duo Manish Shashikant Ambekar and Anwar Ali Qadir Shaikh is involved in 19 similar crimes in Bhayandar, Mira Road, Palghar, Mumbai, Pune and other places.

# चोरी और खोए हुए मोबाइल पाकर खिले लोगों के चेहरे

**डिविजन ने 50 लाख रुपए के सामान लौटाए**



गोपाल गुप्ता | वसई

मोबाइल एक बार गुम या चोरी हो जाए तो अक्सर दोबारा नहीं मिलता है, लेकिन विरार डिविजन की पुलिस ने इस बात को झूठा साबित कर दिया। इस डिविजन की पुलिस ने 50 लाख रुपए का सामान बरामद किए और लोगों को सौंप भी दिए।

चोरी हुए या खोए हुए मोबाइल और अन्य सामान पाकर लोगों के चेहरे खिले गए और पुलिस को धन्यवाद दिया। इस दौरान कई लोगों की आखें नम थीं। विरार विभागीय पुलिस ने जनता के कीमत मोबाइल फोन सहित अन्य सामान बरामद किए थे। बुधवार शाम पांच बजे विरार पुलिस स्टेशन के प्रांगण में सहायक पुलिस कमिश्नर ने हाथों पीड़ितों को उनके सामान वापस किए गए। लूट, चोरी और खोए हुए मोबाइल महीनों बाद पाकर लोगों की खुशी का ठिकाना नहीं रहा। प्रेसवार्ता में एसीपी रामचंद्र देशमुख ने बताया कि विरार, पेल्हार और मांडवी पुलिस ने सिर्फ अपराध नियंत्रित करने में ही नहीं, बल्कि खोए मोबाइल रिकवर करने में भी उपलब्धि हासिल की है।

## घर में 40 रुपए का ताला नहीं डोर ग्रिल लगाएं-पुलिस

पुलिस ने 50 लाख 65 हजार 484 रुपए के मोबाइल फोन, सोने-चांदी के आभूषण, स्कार्पियो और इनोवा सहित ट्रैक्टर रिकवर किया और जनता में खाकी के विश्वास को बढ़ाया है। एसीपी रामचंद्र देशमुख ने शहर की जनता से अपील करते हुए कहा कि अगर आपका मोबाइल कहीं गुम हो जाए, चोरी या लूट के शिकार हो जाते हैं, तो सबसे पहले मामले की शिकायत दर्ज कराएं। जागरूक नागरिक बनकर घर पर 40 रुपए का ताला नहीं, बल्कि डोर ग्रिल लगाएं। सोसायटी में सीसीटीवी कैमरे लगाएं, जिससे हर गतिविधि पर नजर रखी जा सकें। इस मौके पर पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे, मांडवी पुलिस स्टेशन के प्रफुल वाघ और विरार पुलिस स्टेशन के राजेंद्र कांबले सहित कर्मचारी और सैकड़ों की तादाद में जनता शामिल हुईं।



मैं एक किसान हूं। कड़ी मेहनत करके खेती करने के लिए कर्ज पर ट्रैक्टर लिया था, लेकिन पिछले महीने चोरी हो गया था। इसकी शिकायत मांडवी पुलिस में दर्ज कराई थी। पुलिस को कोटि-कोटि धन्यवाद, जो मेरा ट्रैक्टर वापस दिलाया।
**कैलाश नारायण तरे,** खानीवाडे

नालासोपारा निवासी एक महिला आंखों में आंसू लिए कहा कि मैं गरीब विधवा महिला हूं और नालासोपारा हाइवे के जाबर पाड़ा में रहती हूं। कंपनी में काम करके अपने परिवार की आजीविका चलाती हूं। कर्ज पर मोबाइल फोन लिया था। पिछले महीने अचानक मोबाइल कहीं खो गया। पुलिस का लाख लाख धन्यवाद,जो मेरा मोबाइल मुझे वापस किया।
**संजना सचिन गहिला,** जाबर पाड़ा-नालासोपारा

मैं गरीब आदमी हूं। हमाली करके परिवार का पालन-पोषण करता हूं। पिछले महीने मोबाइल फोन चोरी हो गया था। उम्मीद नहीं थी कि मेरा मोबाइल मिलेगा, लेकिन धन्यवाद पुलिस का।
**बाबू बशीर शेख,** गोकदनी पाड़ा विरार



CamScanner